# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी औरंगाबाद


**जिल्हाधिकारी कार्यालय जि.औरंगाबाद**

☎ : (0240) 2331077, फॅक्स – 2338394, ईमेल – ddmoaurangabad16@gmail.com; abdcoll@gmail.com


जा.क्र.2020/गृह/दडवि-1/कावी- 304 दिनांक : 31/05/2020

**संदर्भ :**
1) साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 खंड 2, 3 व 4.
2) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005.
3) महाराष्ट्र शासन, सावर्जनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुबंई. 32 यांची दिनांक 13 मार्च, 2020 ची अधिसूचना दिनांक 13 मार्च 2020
4) प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुबंई यांचे पत्र क्र. करोना 2020/ प्र.क्र.58/ आरोग्य -5 दिनांक 14 मार्च 2020
5) उपसचिव, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे पत्र क्र.संकिर्ण 2020/प्र.क्र.101 एसडी.4 दिनांक 14 मार्च 2020
6) प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुबंई यांची पत्र क्र.2020/प्र.क्र.58/आरोग्य 5/दिनांक 16 मार्च 2020
7) साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 लागू केल्याचे या कार्यालयाचे दि.15/03/2020 चे आदेश
8) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडिल अधिसूचना क्र.करोना2020/प्र.क्र.58/आरोग्य-5/दिनांक 14.03.2020.
9) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे परिपत्रक क्र.DMU/2020/CR92/DisM-1, दिनांक 02 मे 2020 व दिनांक 17 मे, 2020
10) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे परिपत्रक क्र.DMU/2020/CR92/DisM-1, दिनांक 05 मे 2020
11) या कार्यालयाचे फौजदारी प्रक्रीया संहिता 1973 चे कलम 144 प्रमाणे मनाई आदेश दिनांक 23.03.2020, दिनांक 26.03.2020, दिनांक 13.04.2020, दिनांक 19.04.2020, दिनांक 03.05.2020, दिनांक 17.05.2020 दिनांक 19.05.2020
12) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे आदेश क्र.DMU/2020/CR92/DisM-1, दिनांक 31 मे 2020

## कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव रोखण्यासाठी फौजदारी प्रक्रीया संहिता 1973 चे कलम 144 प्रमाणे मनाई आदेश

:: **आदेश** ::

ज्याअर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना (कोव्हीड-19) या विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषीत केलेला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात, महाराष्ट्रातील शहरात गतीने पसरत आहे असे दिसून येत आहे. तसेच राज्य शासनाने कोरोना विषाणुचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन, सदर कायद्यातील खंड 2, 3 व 4 मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमीत केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आलेली आहे. तसेच आरोग्य मंत्रालय भारत सरकार, आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांनी जाहीर केल्याप्रमाणे कोरोनाग्रस्त रुग्णांच्या इतर लोकांनी संपर्कात येऊ नये तसेच सार्वजनिक किंवा खाजगी ठिकाणी एकत्र येणे, थांबणे, चर्चा करणे, कार्यक्रमाचे आयोजन करणे, इ. बाबींमुळे या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता, सर्वसामान्य जनतेच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून या कार्यालयाचे आदेश संदर्भ क्रमांक 11 अन्वये फौजदारी दंड प्रकिया संहिता 1973 चे कलम 144 (1) (3) अन्वये औरंगाबाद जिल्हयात (पोलीस आयुक्त (शहर) औरंगाबाद यांचे कार्यक्षेत्र वगळून) दिनांक 31 मे 2020 चे 24.00 वाजेपर्यत मनाई आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

ज्याव्दारे संदर्भ क्रमांक 12 अन्वये प्राप्त शासन आदेशानुसार लॉकडाऊनचा कालावधी दिनांक 30 जून 2020 च्या मध्यरात्रीपर्यत वाढवून आलेला आहे.

त्याअर्थी, मी **उदय चौधरी, जिल्हादंडाधिकारी औरंगाबाद,** आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 व फौजदारी दंड प्रकिया संहिता 1973 चे कलम 144 (1) (3) मधील तरतुदीनुसार औरंगाबाद जिल्ह्यासाठी ( पोलीस आयुक्त (शहर) औरंगाबाद यांचे कार्यक्षेत्र वगळून) या कार्यालयाचे संदर्भ क्रमांक 11 वरील आदेशान्वये लागू केलेले मनाई आदेश यापुढे दिनांक 30 जून 2020 चे 24.00 वाजेपर्यंत लागू करीत आहे. पोलीस आयुक्तालय क्षेत्राबाबत पोलीस आयुक्त (शहर) औरंगाबाद यांचे आदेश अंमलात राहतील.

**MISSION BEGIN AGAIN (Guidelines for Easing of Restrictions and Phase-wise opening of Lockdown**

1. सदरील आदेशानुसार दिनांक 01.06.2020 पासून पुढील नियमावली व उपाययोजना लागू करण्यात येत आहे.
2. **कोव्हीड-19 च्या व्यवस्थापनाबाबत केंद्र शासनाचे निर्देशः-**

   परिशिष्ट क्रमांक 1 मध्ये नमूद असल्याप्रमाणे कोव्हीड-19 च्या व्यवस्थापनाबाबत केंद्र शासनाचे निर्देश औरंगाबाद जिल्हयासाठी लागू राहतील.
3. **रात्रीची संचारबंदी**

   अत्यावश्यक बाबी वगळता रात्री 9.00 ते सकाळी 5.00 वाजेपर्यत नागरिकांची हालचाल/आवागमन पुर्णपणे प्रतिबंधीत करण्यात येत आहे.
4. **कमजोर व्यक्तींना/गटांना संसर्गापासून संरक्षण**

   65 वर्षावरील जेष्ठ नागरीक, यापूर्वी इतर आजार असलेल्या व्यक्ती, गरोदर महिला, 10 वर्षाच्या खालील बालके, वैद्यकीय बाबी व अत्यावश्यक बाबी वगळता राष्ट्रीय निर्देकांनुसार घरी राहतील यांची दक्षता घ्यावी.
5. **कन्टेनमेंट झोन-**

   i. सार्वजनिक आरोग्य कुटुंब कल्याण मंत्रालयाने निश्चित केलेल्या मागदर्शक तत्वानुसार महानगरपालिका / जिल्हा प्रशासनाकडुन कन्टेनमेंट झोन निर्धारीत करण्यात येईल.

   ii. औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद तर जिल्हयाच्या उर्वरित भागात जिल्हाधिकारी, औरंगाबाद हे कन्टेनमेंट झोनची निश्चिती करतील. कन्टेनमेंट झोन हे रहिवाशी कॉलनी, मोहल्ला, झोपडपटटी, इमारत, इमारतीचा समुह, गल्ली, महानगरपालिका वार्ड, पोलीस स्टेशनची हद्द, खेडेगांव, गांवाचा समूह, ग्रामपंचायत यांच्या आधारे निश्चित करण्यात येईल.

   iii. कन्टेनमेंट झोनमध्ये केवळ अत्यावश्यक सेवा चालु राहतील. कन्टेनमेंट झोनमध्ये नागरीकांची ये-जा रोखण्यासाठी काटेकोर परिघीय नियंत्रण ठेवण्यात यावे. कन्टेनमेंट झोनमध्ये केवळ वैद्यकीय, आपत्कालीन सेवा आणि जिवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करण्यासाठीच नागरीकांचे आवागमण चालु राहील. याबाबतीत सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचे मार्गदर्शक तत्वाचे पालन करणे बंधनकारक आहे.
6. **निर्बंध शिथील करणे व टप्प्याटप्याने लॉकडाऊन उघडणे.**

   औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात कन्टेंनमेंट क्षेत्र वगळता खालील बाबींना निर्बधासह चालू करण्यास परवानगी राहील. ज्याबाबींना यापुर्वी परवानगी देण्यात आली आहे. (परिशिष्ठ 2)

   i. संदर्भ क्रमांक 4 वरील शासन अधिसूचनेनुसार साथरोग अधिनियम खंड 2 (1) नुसार कोव्हीड-19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच संदर्भ क्रमांक 10 वरील मा. मुख्य सचिव यांचे पत्रानुसार

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रामध्ये बाजार/दुकाने यांचे नियंत्रण करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

ii. त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रामध्ये लॉकडाऊनबाबत आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे आदेश लागू राहतील.

7. **औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्र वगळून (मुद्दा क्रमांक 1 मधील बाबी वगळता) विवक्षीतपणे प्रतिबंध नसलेल्या सर्व गोष्टींना खालील अटी व शर्तीवर परवानगी राहील.**

a. अनुज्ञेय असलेल्या कुठल्याही बाबीसाठी कोणत्याही शासकीय अधिका-यांची परवानगीची आवश्यक असणार नाही.

b. क्रिडा संकुले व क्रिडागृहे तसेच सार्वजनिक वापरातील खुल्या जागावर वैयक्तीक व्यायाम करण्यासाठी परवानगी राहील. तथापी प्रेक्षक आणि समुह गतीविधींना परवानगी असणार नाही. सर्व प्रकारचे शारीरीक व्यायाम आणि इतर सर्व गोष्टी योग्य सामाजिक अंतर ठेवून करणे आवश्यक आहे.

c. सर्व शासकीय व खाजगी वाहतुकीसाठी खालील प्रमाणे प्रवासी अनुज्ञेय असतील.

   i. दुचाकी – केवळ चालक

   ii. तीनचाकी- चालक व इतर 2 प्रवासी

   iii. चारचाकी- चालक व इतर 2 प्रवासी

d. सामाजिक अंतर व निर्जतुकीकरणाच्या उपायांचा अवलंब करुन जिल्हयाअंतर्गत बस वाहतूक जास्तीत जास्त 50 टक्के क्षमतेने करता येईल.

e. आंतर जिल्हा बस वाहतूक बंद राहील.

f. सर्व बाजार / दुकाने सकाळी 9.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यत सुरु राहतील. तथापी गर्दी उसळल्यास व सामाजिकअंतराच्या तत्वाचे पालन होत नाही असे दिसून आल्यास स्थानिक प्राधिकरणाने संबंधीत बाजार/दुकाने तात्काळ बंद करावीत.

8. **मनाई आदेशा दरम्यान दिनांक 30 जून 2020 पर्यत प्रतिबंधीत असलेल्या बाबी (सर्व जिल्ह्यासाठी)**

   i. सर्व शाळा, महाविद्यालये, सर्व प्रकारच्या शैक्षणीक संस्था, प्रशिक्षण केंद्रे, शिकवणी वर्ग/संस्था बंद राहतील. तथापी ऑनलाईन /दुरस्थ शिक्षणाला परवानगी राहील.

   ii. सर्व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रवासी हवाई वाहतूक - वैद्यकीय सेवा, एअर ॲम्बुलन्स, सुरक्षा विषयक बाबी आणि गृहमंत्रालयाने परवानगी दिलेल्या बाबी वगळून बंद राहील.

   iii. रेल्वे प्रवासी वाहतूक व खाजगी विमान सेवा बंद राहतील तथापी स्वतंत्र आदेशाव्दारे परवानगी दिलेल्या बाबी वगळून.

   iv. सर्व सिनेमा गृहे, व्यायाम शाळा, जलतरण तलाव, मनोरंजन केंद्रे, प्रेक्षागृहे, बार, सभागृहे, मंगल कार्यालये आणि एकत्रित जमण्याची ठिकाणे आणि तत्सम इतर ठिकाणे.

   v. सर्व सामाजिक/राजकीय/ क्रिडा विषयक/ मनोरंजन /शैक्षणिक / सांस्कृतीक /धार्मिक कार्यक्रम / इतर संमेलने.

   vi. सर्व धार्मिक स्थळे तसेच इतर सर्व प्रार्थना स्थळे भाविकांना दर्शनासाठी बंद राहतील. सर्व धार्मिक सभा/परिषदा बंद राहतील.

शॉपिंग मॉल, हॉटेल, रेस्टॉरेंट आणि इतर सर्व आदरातिथ्य सेवा बंद राहतील. मात्र आरोग्य/पोलीस/शासकीय अधिकारी/आरोग्य विषयक कर्मचारी, लॉकडाऊनमुळे अडकलेल्या व्यक्ती जसे की, पर्यटक आणि अलगीकरणासाठी आवश्यक असणारी आदरातिथ्य सेवा चालु राहतील. तसेच बस डेपो, रेल्वे स्टेशन आणि विमानतळावरील उपहारगृहे चालू राहतील. घरपोच सेवा देण्यासाठी उपहारागृहाना त्यांचे किचन चालू ठेवता येईल.

**9. ठराविक व्यक्ती व वंस्तुच्या आवागमणास सुनिश्चित करण्याबाबतचे विशेष निर्देश**

i. सर्व वैद्यकीय क्षेत्राशी निगडीत व्यक्ती जसे की, डॉक्टर्स, नर्सेस, सर्व पॅरामेडीकल कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी, ॲम्बूलन्स यांना कोणत्याही निर्बंधाशिवाय आंतरराज्यीय आणि आंतर जिल्हा-आवागमनास परवानगी राहील.

ii. निर्गमित केलेल्या आदर्श मार्गदर्शक तत्वानुसार आंतर राज्य व आंतर जिल्हयामध्ये अडकलेल्या कामगार, प्रवासी कामगार, यात्रेकरू, पर्यटक इत्यादींच्या हालचाली नियंत्रित असतील.

iii. निर्गमित केलेल्या आदर्श मार्गदर्शक तत्वानुसार श्रमिक विशेष गाड्या चालू राहतील.

iv. सर्व रिकाम्या ट्रकसह सर्व प्रकारच्या वस्तू /मालवाहतुकीची आंतरराज्यीय हालचाल करण्यास परवानगी राहील.

**10. आरोग्य सेतू ॲपचा वापर**

i. आरोग्य सेतू ॲप हे संसर्गाची संभाव्य धोक्याची सुरवातीच्या काळात माहिती देते त्यामुळे ते व्यक्तींसाठी व समाजासाठी सुरक्षा कवचाप्रमाणे काम करते.

ii. कार्यालये व कामाच्या ठिकाणांची सुरक्षीतता विचारात घेता जास्तीत जास्त कर्मचारी आरोग्य सेतू ॲप अनुरुप मोबाईल फोनमध्ये Install करतील याची खात्री करावी.

iii. जिल्हा प्रशासन नागरिकांना आरोग्य सेतू ॲपचा वापर करावा आणि त्यांचे आरोग्याची अद्ययावत माहिती सदरील ॲपवर अपलोड करावी असे आवाहन करीत आहे. जेणे करून जोखमीच्या वेळी सबंधीताना तात्काळ वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देता येईल.

**11.** स्थानिक पातळीवर नागरीकांनी स्वतः हून काही आस्थापना/दुकाने बंद ठेवण्याचा निर्णय घेतला असला तरी अत्यावश्यक गोष्टींची दुकाने,औषधालये व कृषि सेवा संबंधीत दुकाने कोणत्याही परिस्थितीत चालु राहतील.

**12. दंडात्मक तरतूदी –** उपरोक्त आदेशाचे पालन न करणाऱ्या व्यक्ती, संस्था अथवा समूह यांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 ते 60 तसेच भा.दं.वि. 1860 चे कलम 188 नुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

वरील आदेशाची अंमलबजावणी करीत असतांना सद्हेतुने केलेल्या कृत्यासाठी कुठल्याही अधिकारी व कर्मचारी यांचेवर विरुध्द कुठल्याही प्रकारची कायदेशिर कारवाई अथवा खटला दाखल करता येणार नाही .

सदरील आदेश दिनांक 31 मे 2020 रोजी माझी सही व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी निर्गमीत करण्यात येत आहे.

**सोबत- परिशिष्ट – 1 व 2**

**( उदय चौधरी )**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**औरंगाबाद**

**प्रत माहितीस्तव तथा आवश्यक कार्यवाहीस्तव :**

1) मा.अपर मुख्य सचिव, गृहविभाग (विशेष) मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.
2) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
3) मा.पोलीस आयुक्त (शहर) औरंगाबाद.
4) आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद.

5) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.औरंगाबाद.
6) पोलीस अधिक्षक (ग्रामीण),औरंगाबाद.
7) मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण / पारेषण कंपनी मर्या. औरंगाबाद.
8) सहसंचालक (उद्योग), औरंगाबाद,
9) सहसंचालक (उद्योग सुरक्षा) व मुख्य अभियंता (मऔविम), औरंगाबाद
10) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद.
11) जिल्हा शल्य चिकित्सक, औरंगाबाद.
12) प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद.
13) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, औरंगाबाद
14) उपायुक्त, अन्न व औषध प्रशासन, औरंगाबाद.
15) प्रादेशिक अधिकारी, म.औ.वि.म. औरंगाबाद
16) जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद
17) सर्व उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, औरंगाबाद जिल्हा (सर्व).
18) जिल्हा प्रशासन अधिकारी, औरंगाबाद.
19) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, औरंगाबाद
20) विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, औरंगाबाद.
21) जिल्हा माहिती अधिकारी, औरंगाबाद.
22) सर्व तहसिलदार तथा तालुकादंडाधिकारी, जिल्हा औरंगाबाद.

Office of the Collector & District Magistrate ★ Aurangabad ★

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**औरंगाबाद**

# परिशिष्ट-1

## MISSION BEGIN AGAIN
## कोविड-19 च्या व्यवस्थापनासाठी राष्ट्रीय मार्गदर्शक तत्वे

### सार्वजनिक ठिकाणे-

1. सर्व सार्वजनिक ठिकाणी, कामाच्या ठिकाणी व प्रवास करतांना फेस मास्क वापरणे बंधनकारक आहे.
2. सार्वजनिक ठिकाणी दोन व्यक्तीमधील अंतर किमान 6 फुट (दो गज की दुरी) ठेवावे. दुकानामध्ये ग्राहकाची संख्या एकावेळी 5 पेक्षा जास्त असणार नाही. याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधीत दुकानदार/आस्थापना चालक यांचेवर राहील.
3. मोठया प्रमाणावर गर्दी होणारे ठिकाणे जसे की, संमेलने/परिषदा इ. प्रतिबंधीत असतील.
   विवाहा सारख्या सार्वजनिक कार्यक्रमात सामाजिक अंतर ठेवून 50 पेक्षा जास्त व्यक्तींना उपस्थित राहण्यास परवानगी नसेल तसेच अंत्यविधीसाठी 20 पेक्षा अधिक व्यक्तींना परवानगी असणार नाही.
4. सार्वजनिक ठिकाणी व कामाच्या ठिकाणी थुंकणे दंडनिय राहील. व त्यासाठी संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कायद्यानुसार दंड आकारण्यात यावा.
5. सार्वजनिक ठिकाणी पान, तबाखू, गुटखा, मद्य, धुम्रपान यांचे सेवन करण्यास मनाई राहील.
6. पान, तंबाखूची दुकाने, रेस्टॉरंट पुर्णपणे बंद राहतील.

**कामाच्या ठिकाणाबाबत अतिरिक्त सूचना**

7. जेथे शक्य असेल तेथे जास्तीत जास्त घरी राहून काम (Work from Home ) चा अवलंब करावा.
8. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाकडुन निर्गमित सूचनानुसार सर्व प्रवेश व निर्गम स्थानावर थर्मल स्कॅनिंग, सॅनिटाइझर व हात धुण्याची सुविधा उपलब्ध करावी. कामाच्या ठिकाणी पुरेशा प्रमाणात सॅनिटायझर, हॅड वॉश उपलब्ध करुन देण्यात यावे.
9. सर्व कामाच्या ठिकाणाचे, सार्वजनिक सुविधांचे आणि मानवी संपर्कात येणारी सर्व ठिकाणी जसे की, दरवाजाचे हॅडल आदींचे दोन पाळयादरम्यान तसेच वांरवार निर्जतूकीकरण करावे.
10. दोन पाळयामध्ये सुयोग्य अंतर ठेवून तसेच भोजन अवकाश योग्य वेळेचा ठेवून व इतर मार्गाचा वापर करून कामाच्या ठिकाणी योग्य सामाजिक अंतर पाळले जाईल यांची दक्षता घ्यावी.

Officer of the Collector & District Magistrate ★ Aurangabad ★

( उदय चौधरी )
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
औरंगाबाद

# परिशिष्ट-2

## MISSION BEGIN AGAIN

## मुद्दा क्रमांक 6 च्या अनुषंगाने दिनांक 19.05.2020 पर्यंतच्या सर्व आदेशानुसार अनुज्ञेय असलेल्या सर्व बाबी

i. सर्व अत्यावश्यक सेवा पुरविणा-या दुकानांना यापुर्वीच्या आदेशाप्रमाणे चालु राहण्यास परवानगी असेल.
ii. सर्व अत्यावश्यक सेवा पुरवित नसलेल्या दुकानांना यापुर्वीच्या आदेशाप्रमाणे दिलेली सुट व मार्गदर्शक तत्वांच्या आधारावर चालु राहण्यास परवानगी राहील. तसेच अशी दुकाने संबंधीत महानगरपालिकांनी घेतलेल्या निर्णयानुसार कार्यरत राहतील.
iii. सर्व अत्यावश्यक वस्तु/साहित्य व अत्यावश्यक नसलेल्या वस्तु/साहित्य यांच्या ई-कॉमर्स सेवा चालू राहतील.
iv. सद्या चालू असलेली सर्व औद्योगिक केंद्रे कार्यरत राहतील.
v. सर्व बांधकामाशी निगडित क्षेत्रातील (सार्वजनिक/खाजगी) कामे सुरु राहतील. तसेच सर्व मान्सुनपुर्व कामे (सावर्जनिक/खाजगी) सुरु राहतील.
vi. घरपोच सेवा देण्यासाठी उपहारागृहाना त्यांचे किचन चालू ठेवता येईल.
vii. ऑनलाईन /दुरस्थ शिक्षणाला परवानगी राहील.
viii. सर्व शासकीय कार्यालये 5 टक्के किंवा 10 व्यक्ती (जे जास्त असेल ते) या तत्वावर चालू राहतील.
ix. नागरीकांच्या हालचालीसाठी खालील प्रमाणे प्रवासी अनुज्ञेय असतील.
    i. दुचाकी – केवळ चालक
    ii. चारचाकी- चालक व इतर 2 प्रवासी
x. एखाद्या विशेष किंवा सर्वसाधारण आदेशानुसार इतर कोणत्याही बाबींसाठी परवानगी राहील.

Office of the Collector & District Magistrate ★ Aurangabad ★

( उदय चौधरी )
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
औरंगाबाद